**ठळक बातम्या**

- माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं निधन

- राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि इतर मान्यवरांची सोरेन यांना आदरांजली

- रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून गेल्या १६ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख जणांना रोजगार मिळाला असल्याचं सरकारचं लोकसभेत निवेदन

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून मुंबईत सुरू

**आणि**

- अँडरसन - तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात इंग्लंड विजयाच्या उंबरठ्यावर

**<><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं आज नवी दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते. दीड महिन्यापूर्वी त्यांची प्रकृती अधिक बिघडली होती.

शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. दुमका मतदारसंघातून ते तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. तर दोन वेळा राज्यसभेचे सदस्य होते.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. मात्र चिरुडीह हत्याकांडात त्यांचं नाव समोर आल्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. २००७ मधे दिल्ली उच्च न्यायालयात त्यांची सुटका झाली.

संथाल जमातीतले सोरेन यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं.

झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल झारखंडमधे तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला आहे.

**<><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी आपल्या समाज माध्यमावर शोक व्यक्त केला आहे.

सोरेन यांचं निधन हे सामाजिक न्यायाच्या क्षेत्राचं मोठं नुकसान आहे. सोरेन यांनी आदिवासींना ओळख मिळावी म्हणून आणि झारखंड राज्याच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. तर, सोरेन हे आदिवासी समुदाय, गोरगरीब आणि दलितांचं सक्षमीकरण करणारे नेते होते, अशा शोकभावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या आहेत. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी बोलून त्यांचं सांत्वन केल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. शिबू सोरेन हे आपल्या साध्या सरळ व्यक्तिमत्त्वामुळे लोकप्रिय झाले. त्यांच्या निधनाचं वृत्त हे अत्यंत दुःखद असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सोरेन यांना आदरांजली वाहताना लिहिलं की, देशातल्या सर्वात ज्येष्ठ नेत्यांपैकी एक असणारे सोरेन यांनी समाजातल्या दुर्बल घटकांच्या हक्क आणि सक्षमीकरणासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. सोरेन यांनी झारखंडच्या राजकारणात जवळपास पाच दशकं समर्पित भावनेनं काम केलं. त्यांच्या निधनामुळे झारखंडने एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आणि एक कुशल संसदपटू गमावल्याची भावना राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

**<><><><>**

राज्यसभेचं कामकाज आज सकाळी सुरु झाल्यावर दिवंगत नेते शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, आणि त्यानंतर सदनाचं कामकाज उद्या सकाळपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेतही दिवंगत नेते शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><>**

विविध मुद्द्यांवर विरोधी पक्ष सदस्यांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

रोजगार मेळ्यात मागच्या १६ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत, एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार गेल्या दशकात १७ कोटीहून अधिक युवकांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. युपीए सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात रोजगाराच्या केवळ ३ कोटी संधी निर्माण झाल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजने अंतर्गत येत्या ५ वर्षात ४ कोटीहून अधिक रोजगार संधी निर्माण करण्यासाठी सरकारनं २ लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

काँग्रेस प्रणित सरकारच्या काळात कृषी क्षेत्रात रोजगार निर्मितीचं प्रमाण उणे १६ टक्के इतकं खाली घसरलं होतं, ते एन डी ए सरकारच्या काळात १९ टक्क्यांवर पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. उत्पादन क्षेत्रात २००४ ते २०१४ या काळात ६ टक्क्यांवर असलेलं रोजगार निर्मितीचं प्रमाण गेल्या दशकात १५ टक्क्यांपर्यंत वाढलं, असं ते म्हणाले. देशातल्या बेरोजगारांचं प्रमाण ३ पूर्णांक २ दशांश इतकं खाली घसरलं असून ते अनेक विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

भारत आणि अमेरिकेदरम्यान अलिकडेच झालेल्या करविषयक घडामोडींबाबत अफवा पसरवणाऱ्या किंवा खोटे दावे करणाऱ्या समाज माध्यमावरच्या आशयांना बळी पडू नये, असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे. कार्यालयाच्या सत्यता पडताळणी विभागाने असे आशय निर्माण अथवा सामायिक करणाऱ्यांवर कठोर टीका केली आहे. असा कोणताही आशय आपल्याकडे सामायिक करण्यापूर्वी किंवा त्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी अधिकृत स्रोतांकडून पडताळणी करून घेण्याचं आवाहनही विभागाने वापरकर्त्यांना केलं आहे.

<><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती येत्या बुधवारी पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्के कपात होण्याची शक्यता भारतीय स्टेट

बँकेनं वर्तवली आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही, असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

<><><><>

बिहारमधे मतदारयाद्यांच्या पुनरिक्षणात ६५ लाख ६४ हजार व्यक्तींची नावं हटवण्याचा आल्याचा आरोप काँग्रेसनं आज वार्ताहर परिषदेत केला. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या गैरप्रकारांबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रांना प्रतिसाद मिळाला नाही असं बिहारचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश कुमार यांनी सांगितलं. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर यादीतून वगळण्यात आलेल्या लोकांची यादी नाही. शिवाय त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनातही त्याचा उल्लेख नाही, असं ते म्हणाले.

<><><><>

लंडनच्या केनिंगटन ओव्हल मैदानावर सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात काल चौथ्या दिवशी अपुऱ्या उजेडामुळं खेळ थांबवण्यात आला तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात सहा गडी बाद ३३९ धावा झाल्या होत्या. ज्यो रूटनं १०५ आणि हॅरी ब्रुकनं १११ धावा केल्या. आज पाचव्या दिवशी सामना जिंकण्यासाठी इंग्लंडला ३५ धावांची तर भारताला विजयासाठी चार बळींची आवश्यकता आहे.

<><><><>

अमेरिकेतल्या पाइनहर्स्ट इथं झालेल्या लहान मुलांच्या जागतिक गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या वेदिका भन्साळी हिनं विजय मिळवत सुवर्णपदक पटकावलं आहे. ९ वर्षांखालील गटात खेळताना वेदिकाने ३३-३३-३२ असे गुण मिळवत जपानच्या एमी मिनामी हिचा एका शॉटने तर अमेरिकेच्या औद्रे झांग हिचा दोन शॉटने पराभव केला.

दुसरीकडे मुलींच्या अकरा वर्षांखालील गटात भारताच्याच ऐदा तिमय्याने तिसरं स्थान पटकावलं आहे.

<><><><>

महिलांच्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी नवी दिल्ली इथे झालेल्या सराव सामन्यांमध्ये अंतिम पंघाल हिने ५३ किलो वजनी गटात विजयी होत भारतीय संघात आपलं स्थान निश्चित केलं आहे. तर ६५ किलो वजनी गटात महाराष्ट्राच्या वैष्णवी पाटील

हिनेही भारतीय संघात आपलं स्थान निश्चित केलं आहे. ६२ किलो वजनी गटात मनिषा भानवाला हिने, ७२ किलो वजनी गटात ज्योती तर ७६ किलो वजनी गटात प्रिया मलिक हे खेळाडू अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवडले गेले आहेत.

**<><><><>**

उत्तर प्रदेशात संततधार पावसामुळं अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, १७ जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती उद्भवली आहे. ४०२ गावातल्या ८४ हजारांहून अधिक लोकांना पुराचा फटका बसला असून, ३४३ घरांची पडझड झाली आहे. ४ हजार १५ हेक्टरपेक्षा जास्त जमीन पाण्याखाली गेली आहे. पूरग्रस्त भागात बचाव आणि मदत कार्य सुरू आहे, अशी माहिती मदत आयुक्त भानु चंद्र गोस्वामी यांनी दिली.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पूर परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत, असंही गोस्वामी यांनी सांगितलं.

**<><><><>**

अरुणाचल प्रदेश, आसामसह मेघालय, बिहार, हिमाचल प्रदेश, केरळ, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. बिहार, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, पश्चिम बंगालमधला गंगा खोऱ्याचा भाग, जम्मू काश्मीर, लडाख, झारखंड, कर्नाटक आणि मध्य प्रदेशच्या पश्चिम भागात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><>//**